राष्ट्रीय सहकार विकास निगम योजनेखाली मच्छिमार सहकारी संस्थांना, बर्फ कारखाना/शितगृहे ऊभारणे, यांत्रिक नौका बांधणे, गोडावून बांधणे इत्यादीसाठी अर्थसहाय्याचे सुधारित आकृतीबंध.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र. रासनि-१२९३/(१५९)/पदुम-१४,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः-४ फेब्रुवारी, १९९७.

पहाः-

१) शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक.रासनि-१२९३/(१५९)/पदुम-१४, दिनांक ८ जानेवारी, १९९६

२) आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई यांचे पत्र क्र.०६११०१/१४७०/१०९५, दिनांक. २४ सप्टेंबर, १९९६.

शासन शुध्दीपत्रः-

१. शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक. रासनि-१२९३/(१५९)/पदुम-१४, दिनांक ८ जानेवारी, १९९६ मधील परिच्छेद ४ (१) खालीलप्रमाणे वाचण्यांत यावेः-

"गटाला यांत्रिकी नौका बांधण्यासाठी शासनाकडून (प्रस्तावास) मंजुरी मिळाल्यानंतर जिल्हयाच्या सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालकांनी प्रकल्प किंमतीच्या ९० टक्के मंजुर अर्थसहाय्यापैकी, ३० टक्के खास विमोचक भाग भांडवल आणि ५ टक्के भाग भांडवल याप्रमाणे ३५ टक्के रक्कम नौका बांधण्यासाठी उपलब्ध करावी,

३५ टक्के रक्कम उपलब्ध करुन दिल्यानंतर, त्यामधुन नौकेचे बांधकाम १० किंवा ११ फळयापर्यन्त झाल्यानंतर, गटाने ५ टक्के रक्कम रोख स्वरुपात नौकेच्या उर्वरित बांधकामासाठी संस्थेत जमा करुन त्याची पावती जिल्हा कार्यालयाकडे सादर करावी अथवा गटाने ५ टक्के भाग भांडवलाच्या किंमती इतके लाकूड उदा. वाके फळया, आडयाची लाकडे इत्यादी खरेदी करुन त्यांच्या खरेदीच्या पावत्या सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालकाकडे संस्थेमार्फत सादर कराव्यात. गटाने त्यांच्या स्वतःच्या भांडवलातून आवश्यक

त्या रकमेएवढे लाकूड खरेदी केले आहे यावी प्रत्यक्षपणे खात्री सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालकांनी करावी व नंतरच उर्वरित रक्कम खालीलप्रमाणे अदा करावी-

(अ) गटाने ५ टक्के रक्कमेची रोख/वस्तुरुपाने (नौका बांधण्यासाठी) गुंतवणूक केल्याची प्रत्यक्ष खात्री केल्यानंतर, ५५ टक्के कर्ज रकमेपैकी १० टक्के रक्कम नौकेचे प्रगतीपथावरील बांधकाम पूर्ण होण्यासाठी, सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालकांनी उपलब्ध करावी. त्यानंतर नौकेचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी, संबंधित गटाने स्वतःच्या हिश्श्यापोटी उर्वरित ५ टक्के रक्कमेची गुंतवणूक करावी.

(ब) उर्वरित ४५ टक्के रक्कम इंजिन, विंच, जीवरक्षक, साधने इत्यादीसाठी पुरवठादारांना जिल्हा कार्यालयाने परस्पर अदा करावी".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(वि.रा.बचेरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी आणि सदस्य सचिव जिल्हा नियोजन व विकास मंडळ,
सर्व प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक,
सर्व सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक,
सर्व जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी,
सर्व मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी,
सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), वरळी, मुंबई
सर्व विभागीय निबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध)
सर्व सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध)
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
उपकोषागार अधिकारी, पालघर (जि.ठाणे)/मालवण(जिल्हाःसिंधुदुर्ग)
नियोजन विभाग
वित्त विभाग,
पदुम विभागातील सर्व अधिकारी

महाव्यवस्थापक, राष्ट्रीय सहकार विकास निगम ४ सिरी इन्स्टिटयूशनल एरिया, हौज खास, नवी दिल्ली.
प्रादेशिक संचालक, (पश्चिम), राष्ट्रीय सहकार विकास निगम, १७ महात्मा गांधी रोड, पुणे.
कार्यासन पदुम-१२, पदुम-१३ व पदुम-१६, कृषि व पदुम विभाग.
निवडनस्ती.